अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । बुधवार, दि. १८ फेब्रुवारी २०२६ । वर्ष : २४ वे अंक : १४१ वा किंमत : ५ रुपये पाने १२

## भारताने पुढे केला मैत्रीचा हात; बांगलादेशचे पंतप्रधान तारिक रहमान यांना दिल्ली दौऱ्याचे आमंत्रण



**नवी दिल्ली** : बांग्लादेशात राजकिय सत्तांतरानंतर आज अखेर तारिक रहमान यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. या शपथविधींसह मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारचा १८ महिन्यांचा कार्यकाळ समाप्त झाला. या संपूर्ण काळात देशात राजकिय अनिश्चितता आणि अस्थिरतेचे वातावरण होते. मात्र, आता नवीन सरकारकडून स्थैर्याची अपेक्षा केली जात आहे.

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मंगळवारी (१७ फेब्रुवारी) बांग्लादेशचे नवनिर्वाचित पंतप्रधान तारिक रहमान यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे वैयक्तिक अभिनंदनपत्र तारिक रहमान यांच्याकडे सुपूर्द केले.

# चेंडू CBIच्या पिचवर तपास टर्निंग पाईंटवर






**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेची केंद्रीय गुप्तचर खाते अर्थात सीबीआयच्या वतीने चौकशी करण्याची मागणी अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आल्याने राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.हे निवेदन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे पाठवण्याची विंनती मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे.महायुतीच्या सत्तेत असणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसकडूनच ही मागणी केल्याने भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाची कोंडी होणार असून या मागणीने अजित पवारांच्या अपघाताचे प्रकरण कोणते वळण घेणार याकडे राज्याच लागून असेल

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रमुख नेत्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी, अजित पवार यांच्या अपघात प्रकरणाची सीबीआय मार्फत चौकशी करावी या आशयाचे पत्र मुख्यमंत्र्यांना देण्यात आले.अजित दादांचा मृत्यू अपघाती झाला की घातपात यासंदर्भाने चौकशीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले. तसेच, संबंधित अपघाताची सीबीआयमार्फत चौकशी करण्याची मागणी केल्याचेही सुनिल तटकरे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पार्थ पवार, प्रफुल पटेल, सुनील तटकरे, हसन मुश्रीफ यांची यावेळी उपस्थिती होती. फडणवीस यांच्याकडून संबंधित प्रकरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना सीबीआय चौकशी करण्याबाबत तसेच अपघाताची नेमकी कारणे समोर आणण्याबाबत विनंती करण्याचे आश्वासन देण्यात आले.

अपघातात अजित पवार यांचा दुर्दैवीरित्या मृत्यू झाल्यानंतर या प्रकरणाची ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सखोल माहिती घेतली होती.यावर राजकारण होवू नये म्हणून त्यांनी त्याचवेळी स्पष्टीकरण दिले होते.हा निव्वळ अपघात आहे,असे पवार म्हणाले होते.त्यानंतर आ.रोहित पवार यांनी हा अपघात नसून घातपात असल्याचे विधान करून संशय निर्माण केलेला होता.अजित पवार राष्ट्रवारी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी उशिरा सीबीआयची मागणी का करावी याविषयी देखील राजकिय जाणकार संभ्रमात आहेत.

# पुराव्यांची तोफ आज पुन्हा धडधडणार!



**पवार फॅमिलीतील एक सदस्य आ.रोहित पवार यांनी हा अपघात नसून घातपात असल्याचा संशय गेल्या आठवड्यात व्यक्त केला होता.आ.पवार यांनी पत्रकार परिषद घेवून विमान दुर्घटनेचा सारा घटनाक्रम सांगितला होता आणि हा अपघात नाही तर घातपात असल्याचे रोखठोक विधान केल्यानंतर राज्यात मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.त्यातच मंगळवारी आ.पवार यांनी सूचक विधान केल्याने या प्रकरणाचे गूढ आणखीन वाढले आहे.**

### रोहित पवारांकडे मोठा पुरावा?

आ. रोहित पवार यांनी हे प्रकरण लावून धरले असून याविषयी ते सातत्याने शंका निर्माण करत आहेत. त्यातच, आज बुधवारी ते पत्रकार परिषद घेऊन पुन्हा एकदा गौप्यस्फोट करणार असल्याचा दावा त्यांच्याकडून करण्यात आलाय. आज सेशन कोर्टात ईडीच्या प्रकरणी सुनावणीकरता गेले असता त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

### विलीनीकरापेक्षा अपघाताचा विषय महत्वाचा

आता अपघाताचा विषय महत्वाचा आहे. आम्ही विलीनीकरणावर चर्चा करू शकतो, कारण आमच्याकडे पुरावे आहेत. मेसेज, व्हिडिओपासून फोनवर काय बोलणे झालेय हे सर्व आमच्याकडे आहे. परंतु, यावर आता बोलणार नाही. बुधवारी ब्लॅक बॉक्ससह इतर विषयांवर सखोल पत्रकार परिषद घेणार आहोत'', असे ते म्हणाले.

### सर्व डिटेल माहिती देणार

अजित पवारांचा घातपातच आहे, यावर तुम्ही ठाम आहात का? असा प्रश्न रोहित पवारांना विचारण्यात आला. त्यावर ते म्हणाले, ''अजून २० तास तुम्ही थांबा, उद्या साडेदहा वाजता याबाबतीत चर्चा करू. तपास अत्यंत धीम्यागतीने चालू आहे. तपासातून काहीच निष्पन्न होत नाही. वीसीआर कंपनी अद्यापही ऑपरेशनमध्ये आहे. सरकारकडून या तपासात दुर्लक्ष होतेय का, भारताबाहेर ब्लॅक बॉक्स पाठवावे लागेल, या सर्वाची माहिती देण्याकरता पत्रकार परिषद घेणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

### ब्लॅक बॉक्स राजकारणापासून सुरक्षित नाही

दरम्यान, विमान अपघातात आगीत ब्लॅक बॉक्स जळाल्याचे वृत्त आहे. याबाबत पत्रकारांनी विचारले असता, पवार म्हणाले, ''ब्लॅक बॉक्स पाऊस, आग, उन्हापासून सुरक्षित आहे, पण राजकारणापासून सुरक्षित नाही.आज डिटेलमध्ये जाऊन काय घडले असावे, कोणत्या नवीन गोष्टी आमच्यापर्यंत आल्या आहेत ती माहिती आज देणार आहे'', असंही ते म्हणाले.

# स्वीकृत सदस्यपदासाठी लॉटरी कोणाला लागणार?

## आज महापालिकेत अर्ज स्वीकृती; भाजपमध्ये तीव्र स्पर्धा



**सोलापूर** : सोलापूर महानगरपालिका मधील १० स्वीकृत सदस्यपदांच्या नियुक्तीसाठी राजकिय हालचालींना वेग आला असून भारतीय जनता पक्षामध्ये या पदासाठी तीव्र स्पर्धा निर्माण झाली आहे. बुधवार हा अर्ज भरण्याचा दिवस असला तरी भाजपकडून अद्याप अधिकृतपणे कोणतीही नावे जाहीर करण्यात आली नाहीत.

### भाजपाकडून यांच्या नावांची चर्चा

स्वीकृत सदस्यत्वासाठी भाजपाकडून रोहिणी तडवळकर, मनीष देशमुख, माजी नगरसेविका कुमुद अंकाराम , प्रभाकर जामगुंडे, अविनाश महागावकर, रेणुका महागावकर,पद्माकर काळे, केदार उंबरजे, सुधा अळ्ळीमोरे, संतोष सोमा,ॲड. प्रदीपसिंह रजपूत, वृषाली चालुक्य, सोमनाथ केंगनाळकर, सुनील संचेती, जगदीश पाटील आदींच्या नावांची चर्चा आहे.

त्यामुळे इच्छुकांमध्ये अस्वस्थता दिसून येत आहे. बुधवारी सर्वच इच्छुकांना अर्ज भरण्यास पक्षाने सांगितले आहे. मात्र ती ९ नावे शुक्रवारीच महापालिका सभेत जाहीर करण्यात येणार आहेत.

महापालिकेच्या नामनिर्देशित म्हणजेच १० स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीकरिता संबंधितांना बुधवार, दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० वाजेपर्यंत महापालिकेतील आयुक्त कार्यालयात अर्ज सादर करावे लागणार आहे. भाजपकडून ९ स्वीकृत सदस्य निवडले जाणार आहेत. त्यासाठी शेकडो इच्छुकांनी पक्षाकडे मागणी केली आहे. मात्र पक्षाने प्रदेशाकडे केवळ २० नावे पाठवली आहेत. त्यातील ९ नावांना पसंती मिळणार आहे. मात्र अद्यापपर्यंत नावे गुलदस्त्यात ठेवली आहेत. या नावांमध्ये मारवाडी समाजाचेही एक नाव आहे. याशिवाय एक वकिल आणि एका उद्योजकाचे नाव आहे. याशिवाय महापालिकेत ज्यांना उमेदवारी मिळाली नाही, अशा दोघांच्या नावाचा समावेश असल्याचे समजते.

पक्षाकडून संभाव्य उमेदवारांना निरोप देण्यात आल्याची माहिती मिळत असून, आवश्यक सर्व कागदपत्रे तयार ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. या पदासाठी पक्षांतर्गत रस्सीखेच वाढली आहे. शहरातील विविध गट, पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून आपापल्या समर्थकांसाठी जोरदार लॉबिंग सुरू असल्याची चर्चा आहे. अधिकृत यादी शेवटच्या क्षणापर्यंत गुप्त ठेवली जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे अखेर कोणाला स्वीकृत सदस्यपदाची लॉटरी' लागणार याकडे संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिले आहे. दरम्यान, सोलापूर महापालिकेची नवीन टर्ममधील पहिली सर्वसाधारण सभा शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता बोलवण्यात आली आहे. या सभेमध्ये १० स्वीकृत सदस्य, स्थायी समितीचे १६ तर परिवहन समितीच्या १२ सदस्यांची नियुक्ती होणार आहे.

# खा. धैर्यशील शिंदेंना भेटले; भाजपवर दबाव टाकण्याचा प्लॅन



**सोलापूर** : भारतीय जनता पक्षाच्या बलाढ्य सत्तेशी विशेषतः पालकमंत्री जयकुमार गोरेंसारख्या मंत्र्यांशी दोन हात करणारे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आहे. जिल्हा परिषद निवडणुकित भाजपने मिळविलेले यश, निधीसंदर्भात गोरेंनी केलेली विधाने आणि मोहिते पाटील यांचे एकनाथ शिंदेंना भेटणे, यामुळे सोलापूरच्या राजकारणात चर्चेला उधाण आले आहे.

माढा लोकसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित विकास कामांबाबत उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची ठाणे येथे जाऊन भेट घेतली, असे या भेटीमागचे कारण मोहिते पाटील यांनी सांगितले आहे. मात्र, त्यांनी साधलेल्या टायमिंगची जिल्ह्यात जोरदार चर्चा रंगली आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीपूर्वी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र निवडणूक लढविण्याबाबत चर्चा झाली होती. त्यादृष्टीने खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली होती. त्या वेळी दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चा जोरात होती. त्यामुळे सत्तेत असणाऱ्या अजितदादांचा पवारांच्या राष्ट्रवादीतील नेत्यांना विकास निधींसाठी आधार होता. पण दादांच्या अपघातील मृत्यूमुळे सगळी समीकरणेच बदलली आहेत. नगरपालिका, जिल्हा परिषदेत निवडणुकीतही भाजप विशेषतः पालकमंत्री जयकुमार गोरे आणि खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी एकमेकांना इशारे-प्रतिइशारे दिले आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपलं सोशल मीडिया चॅनल बंद झालं, आता काय करायचं ?

कल्याण
670-31-380

मुंबई
378-85-249

# खा.सुळेंच्या गंभीर प्रश्नांनी मुख्यमंत्री अडचणीत

**नवी दिल्ली** : राज्याचे अन्न आणि औषण प्रशासन मंत्री तथा अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लाच प्रकरण वेगळे वळण घेण्याची शक्यता आहे.शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खा.सुप्रिया सुळे यांनी या प्रकरणी गंभीर प्रश्न उपस्थित करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कोंडीत पकडले आहे.त्यामुळे या प्रकरणात फडणवीस यांना ॲक्शन घ्यावी लागणार आहे.

खा.सुळे यांनी एक नाही अनेक प्रश्नांची सरबत्ती मुख्यमंत्र्यांवर केली आहे. मंत्रालयाचे अध्यक्ष मुख्यमंत्री असतात. मंत्री हा मंत्रीच असतो. ज्या पद्धतीने ही घटना घडली आहे, ती माझ्यासाठी धक्कादायक आहे. लाचलुचपत कोणाला रिपोर्टिंग करते? गृह मंत्रालयाला. ज्या सहाव्या मजल्यावर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बसतात. गृह खाते हे मुख्यमंत्र्यांकडे आहे. सहाव्या मजल्यावरील गृह मंत्रालयानेच तिसऱ्या, चौथ्या मजल्यावरील त्यांच्या मंत्रिमंडळातील, त्यांच्याच मंत्र्यांकडे एसीबी जाणे, धक्कादायक नाहीये का? मग ती तक्रार कोणी केली? याचे उत्तर मुख्यमंत्र्यांनी दिले पाहिजे'', असा सवाल खा. सुळे यांनी फडणवीस यांना केला आहे.



झिरवळ यांच्या कार्यालयातील लिपीक राजेंद्र ढेरंग याने मंत्रालयातील कार्यालयातच लाच स्वीकारली. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने ही कारवाई केली. या कारवाईमुळे झिरवळ अडचणी आले आहेत.

### नाकाखालीच छापा टाकला

दिल्लीत माध्यमांशी बोलताना त्या म्हणाल्या, कुणी तरी माहिती दिली ना? मग ती कुणी दिली. स्वतःच्याच मंत्र्यांविरोधात, ज्या मंत्रालयाचे अध्यक्ष तुम्ही आहात. विभाग तुमचा आहे. तुम्हीच तुमच्या मंत्र्यांवर छापा टाकता. म्हणजे त्यांच्या नाकाखालीच. मुख्यमंत्र्यांच्या डोळ्यासमोर त्या वास्तूमध्ये, तुमच्या स्वतःच्याच मंत्र्यांविरोधात, त्याचे कार्यालय तुम्ही सील करता. हे खूपच धक्कादायक आहे. मला यावर विश्वास बसत नाहीये. म्हणजे आपल्याच घरात, आपण आपल्याच माणसावर धाड टाकणे'', असे म्हणत सुळे यांनी संपूर्ण प्रकरणावर प्रश्न उपस्थित केला आहे.

तो विभाग मुख्यमंत्र्यांकडे आहे. मुख्यमंत्र्यांनीच स्वतःच्याच मंत्र्यांविरोधात... पुन्हा पुन्हा बोलतेय की, जेव्हा तुम्ही मुख्यमंत्री असता, तेव्हा पक्षाचे नसता. राज्याचे मुख्यमंत्री असता. मंत्री पक्षाचा नसतो, राज्याचा असतो. तुमच्या कॅबिनेटमधील तो मंत्री आहे. आपल्याच टीम मधील सदस्यावर कारवाई. कार्यालय सील केल्याचे मला माध्यमातून कळले'', असेही सुप्रिया सुळे म्हणाल्या.